# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ९/११/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४७९** — **विषय क्रमांक – ४७९**

**दिनांक- ९/११/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४७९**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१३८०/२०२३ दि.२०/१०/२०२३ अन्वये, आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२४५२ दि.२५/१०/२०२३ अन्वये, चिंचवड सि.स.नं. ४५१० आय टु आर च्या बदल्यात ताब्यात आलेल्या जागेवर आयटीआय इमारत बांधणे या कामाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करुन तरतुद वाढ/घट करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४७९**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१३८०/२०२३ दि.२०/१०/२०२३ अन्वये, आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२४५२ दि.२५/१०/२०२३ अन्वये, चिंचवड स.नं.४५१० या ठिकाणी जुनी प्रिमीयर कंपनी आहे. सदर कंपनी बंद करून या ठिकाणी विकासकामा मार्फत निवासी गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. सदरचा भुखंड औद्योगिक असल्याने त्याचे निवासीमध्ये रूपांतर करताना शासनाचे नियमानुसार २१,१७२ चौमी जागा मनपास हस्तांतरीत होणार आहे. सदर जागा हस्तांतरणाची कार्यवाही नगररचना विभागामार्फत सुरू आहे. या जागेसाठी मदर तेरेसा उड्डाणपुलाचे खाली असलेल्या सेवारस्त्यावरून पोहोच रस्ता आहे. या ठिकाणी नवीन आयटीआयची इमारत बांधणेचा प्रस्ताव आहे. सद्यस्थीतीत मोरवाडी येथे असलेली इमारत जुनी असुन जागा कमी पडत आहे. त्यामुळे सदर ITI इमारतीसाठी वरील जागा योग्य होणार आहे. या ठिकाणी ITI तसेच Skill Development विषयक बाबींसाठी या जागेचा उपयोग करणे शक्य आहे. तथापि सदर कामाचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने सदर नविन कामाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस व त्यास प्रशासकिय मान्यता देणेकामी तसेच सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे वाढ /घट करून तरतुद करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| | <table><tr><td>अ. क्र.</td><td>उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव</td><td>कामाची अंदाज पत्रकीय रक्कम</td><td>लेखाशिर्ष</td><td>पान क्र. अ.क्र.</td><td>सन २०२३-२४ चा अंदाज</td><td>वाढ</td><td>घट</td><td>सन २०२३-२४ चा सुधारित अंदाजपत्रक</td></tr><tr><td>१</td><td>चिंचवड सि.स.नं.४५१० आय टु आर च्या बदल्यात ताब्यात आलेल्या जागेवर आयटीआय इमारत बांधणे</td><td>१००.०० कोटी</td><td>स्थापत्य विशेष योजना (व्हिजन २०२५)</td><td>नविन काम</td><td>०</td><td>५०.०० लाख</td><td>-</td><td>५०.०० लाख</td></tr><tr><td>२</td><td>एम्पायर इस्टेट उड्डाणपुलास चिंचवड बाजुकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे. (222300015)</td><td>४०.०० कोटी</td><td>स्थापत्य विशेष योजना (वाहतुक सुधारणा)</td><td>७४/३</td><td>८.९५ कोटी</td><td>-</td><td>५०.०० लाख</td><td>८.४५ कोटी</td></tr><tr><td colspan="5">**एकुण**</td><td>**८.९५ कोटी**</td><td>**५०.०० लाख**</td><td>**५०.०० लाख**</td><td>**८.९५ कोटी**</td></tr></table> |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४८०** — **विषय क्रमांक – ४८०**

**दिनांक- ९/११/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४८०**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/शअ/तां/२३/७४/२०२३ दि.३०/१०/२०२३ अन्वये, आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२५१३ दि. ३०/१०/२०२३ अन्वये, मनपाच्या विकास कामांची गुणवत्ता तपासणी करणेकामी सर्टिफिकेशन इंजीनियर्स इंटरनेशनल लिमिटेड या त्रयस्थ संस्थेची (कंपनीची) नेमणूक करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४८०**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/शअ/तां/२३/७४/२०२३ दि.३०/१०/२०२३ अन्वये, आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२५१३ दि. ३०/१०/२०२३ अन्वये, नागरीकांना पायाभूत सुविधा पुरविणेसाठी मनपामार्फत विविध |

| | |
|---|---|
| | विकास कामे चालू आहेत. विकास कामांचा दर्जा व गुणवत्ता योग्य मानांकाप्रमाणे राखणेची मनपाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रकल्प सल्लागारांमार्फत केली जाणारी, मशिनरी पुरविणे, मंडपाची व फर्निचरची कामे वगळता उर्वरीत विकास कामांचा दर्जा राखणेसाठी मनपाने यापूर्वीच सन २००५ मध्ये एस.जी.एस. इंडिया लि., सन २०११ मध्ये आय. आर. एस. या त्रयस्थ संस्थांची नेमणूक केली आहे. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विकास कामांची व्याप्ती पाहता सदर कामांची गुणवत्ता तपासणीचे काम एस.जी.एस. इंडिया लि. व आय. आर. एस. या दोन्ही कंपनीस मर्यादा येत आहेत. सी.ई.आय.एल. या संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी गुणवत्ता व दर्जा तपासणीचे काम त्रयस्थ संस्था या नात्याने स्विकृत निविदा रकमेच्या १.२५% दराने काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदर संस्था IRS/SGS प्रमाणे कामांच्या तपासणी व्यतिरीक्त केलेल्या कामातील २५% मोजमापे तपासणी करणार आहे. त्यासाठी त्यांस अतिरीक्त कुशल मनुष्यबळ लागणार आहे. सदर संस्थेने तयारी दर्शविल्यानुसार फी अदा करणे आवश्यक आहे. सदरची बीले ही त्या कामाच्या तरतूदीतूनच करणेत येतील. तरी सी.ई.आय.एल. ह्या संस्थेस महापालिकेतील विकास कामांचे गुणवत्ता व दर्जा तपासणी कामी त्रयस्थ संस्था म्हणून (Third Party Inspection Agency) नेमणूक करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४८१** **विषय क्रमांक – ४८१**

**दिनांक- ९/११/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४८१**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.साप्रवि/२/कावि/७२४/२०२३ दि.९/११/२०२३ अन्वये, सेवानिवृत्तीसाठी अर्हताकारी सेवा ग्राह्य धरणेत येऊन पेन्शन योजना लागू करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४८१**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.साप्रवि/२/कावि/७२४/२०२३ दि.९/११/२०२३ अन्वये, श्री.जरांडे उदय गणपत हे दिनांक ०१/११/१९९९ ते दि.११/१०/२००७ पर्यंत सैनिकी सेवेमध्ये कार्यरत होते. श्री.जरांडे उदय गणपत यांची सुरक्षा अधिकारी (गट-ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर दिनांक २६/०३/२०१३ च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सदरहु पदाचा कार्यभार श्री.जरांडे उदय गणपत यांनी दिनांक ०४/०४/२०१३ रोजी स्विकारला आहे. |

| | |
|---|---|
| | पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत नोव्हेंबर, २००५ नंतर रुजू झाल्याने श्री.जरांडे उदय गणपत यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. त्यांनी भारतीय थलसेनेत सेवा केलेली असल्याने, नागरी निवृत्तीवेतनाचा लाभ मिळावा यासाठी सैनिकी सेवा व पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडील सेवा यामधील खंडाचा कालावधी क्षमापित करुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम १९८२ मधील नियम ४८ च्या पोट नियम (१)(ए) व (बी) तरतुदीनुसार केंद्र शासनाकडील सैन्य सेवा निवृत्ती .वेतनाकरीता सेवा म्हणून विचारात घेणे आवश्यक आहे<br><br>श्री,उदय गणपत जरांडे. मुख्य सुरक्षा अधिकारी यांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याकामी सेवा पडताळणी करण्याकरीता Addl Dte Gen of Manpower ,(Policy & Planning) ,New Delhi यांचे कार्यालयाने दिनांक २/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये परिशिष्ट पाच नमुना-२४ (नियम ४०) मध्ये पडताळणी करुन दिलेली आहे . प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी श्री.उदय गणपत जरांडे यांची केंद्र शासनाकडील सैन्य सेवा निवृत्ती वेतनाकरीता ग्राह्य धरण्याबाबत दि.१९/१०/२०२३ रोजी अनुकूल अभिप्राय दिलेला आहे.<br><br>सबब, श्री.उदय गणपत जरांडे यांना सैनिकी सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्यावर किंवा तेव्हापासून निवृत्तवेतना ऐवजी मिळालेल्या कोणताही बोनस किंवा उपदान महानगरपालिका कोषागारात जमा करण्याचे अधिन राहून श्री.उदय गणपत जरांडे यांना नागरी निवृत्तीवेतनाचा लाभ मिळावा यासाठी सैनिकी सेवा व पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडील सेवा यामधील खंडाचा कालावधी क्षमापित करुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ४१ व ४८ च्या पोटनियम(१)(ए) व (बी) मधील तरतूदीनुसार केंद्रशासनाकडील सैन्य सेवा निवृत्ती वेतनाकरिता सेवा म्हणून ग्राहय धरण्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४८२** **विषय क्रमांक – ४८२**

**दिनांक- ९/११/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४८२**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्थापत्य/कावि/७४९/२०२३ दि.९/११/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.३१ नाट्यगृह इमारतीमधील विविध कार्यक्रमांकरीता साहित्य पुरविणे या अंदाजपत्रकातील कामाचे सुधारीत नावासह प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ४८२<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्थापत्य/कावि/७४९/२०२३ दि.९/११/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.३१ नाट्यगृह इमारतीमधील विविध कार्यक्रमांकरीता साहित्य पुरविणे या कामाचे सुधारीत नावास प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या विषयास मा.महापालिका सभा ठराव क्र.४७, दिनांक ०४/०५/२०२२ अन्वये प्रथमतः प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि सदर कामाचे अंदाजपत्रकात विविध बाबींचा समावेश असलेने सदर कामाचे नावात पुढीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. प्रभाग क्र.३१ नाट्यगृह इमारतीमधील विविध कार्यक्रमांकरीता साहित्य पुरविणे. ऐवजी "प्रभाग क्र.३१ नाट्यगृह इमारतीमधील विविध कार्यक्रमांकरीता साहित्य पुरविणे व नाट्यगृह व आजूबाजूच्या परिसरात स्थापत्य विषयक खालीलप्रमाणे कामे करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ. क्रं. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | क्षे. कार्या. | बजेट कोड / पानांक/ अ.क्रं / लेखाशिर्ष | प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२३-२०२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३१ नाट्यगृह इमारतीमधील विविध कार्यक्रमांकरीता साहित्य पुरविणे या कामांतर्गत नाट्यगृह व आजूबाजूच्या परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे | ह | २३२४०१५२० | २०,००,००० | १५,००,००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४८३** **विषय क्रमांक – ४८३**

**दिनांक- ९/११/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४८३**<br>**दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मसाभां/८/कावि/२२६/२०२३ दि.८/११/२०२३ अन्वये, मनपाचे (PGI) वाय.सी.एम. व इतर रूग्णालयाकरिता आवश्यक असणारी उपकरणे/साहित्य स्पेसिफिकेशननुसार खरेदी करणेबाबत. |

**ठराव क्र. ४८३**
**दिनांक-९/११/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मसाभां/८/कावि/२२६/२०२३ दि.८/११/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे (PGI) वाय.सी.एम. व इतर रूग्णालयाकरिता आवश्यक असणारी उपकरणे/साहित्य खरेदी, मनपा रुग्णालयातील तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना आवश्यक असलेल्या उपकरणे/साहित्याची खरेदी ही स्पेसिफिकेशननुसार असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने साहित्य/उपकरणांची खरेदी करताना स्पेसिफिकेशन बाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. याबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन (DMER) मुंबई व आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय यांचेकडील स्पेसिफिकेशननुसार उपकरणे/साहित्य खरेदीकामी मा.आयुक्त सो यांचे दालनामध्ये, अतिरिक्त आयुक्त, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, उपायुक्त (भांडार), अधिष्ठाता, पी.जी.आय. वाय.सी.एम. रुग्णालय, वैद्यकीय विभागप्रमुख यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते निर्णय घेणेत आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| १ | मनपाचे वाय.सी.एम.(PGI) रुग्णालय व इतर रूग्णालयाकरिता आवश्यक असणारी उपकरणे/ साहित्य खरेदी करणेबाबत | मनपाचे वाय.सी.एम.(PGI) रुग्णालय व इतर रूग्णालयाकरिता आवश्यक असणारी उपकरणे/साहित्य खरेदी करणेकामी विनिर्दिष्ठ (Specifications)<br><br>“संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (DMER) मुंबई यांनी निश्चित केलेल्या”<br><br>किंवा<br><br>“संचालनालयाचे अधिन शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांनी निश्चित केलेल्या”<br><br>किंवा<br><br>“इतर महानगरपालिका अधिन वैद्यकिय महाविद्यालय/रुग्णालय यांनी निश्चित केलेल्या”विनिर्दिष्ठा (Specifications)प्रमाणे असावे.”<br><br>उक्त नमूद स्पेसिफिकेशन उपलब्ध नसलेस महापालिकेचे संबधित विषयाचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी,प्राध्यापक व बायोमेडिकल विभाग यांचे समितीने निश्चित केलेले सर्व समावेशक विनिर्दिष्टे (Specifications)मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने खरेदीकामी वापरण्यात यावे. |

वरीलप्रमाणे मनपाचे रुग्णालयास आवश्यक असणारी उपकरण/साहित्य खरेदी व स्पेसिफिकेशन बाबत निर्णय घेणे ही धोरणात्मक बाब असल्याने त्यास महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, रुग्णालयीन कामकाजाचे सोईचे दृष्टीने मनपाचे वाय.सी.एम.(PGI) व इतर रूग्णालयाकरिता आवश्यक असणारी उपकरणे/साहित्य खरेदी

| | |
|---|---|
| | करताना उक्त नमूद धोरण निश्चित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६८ नुसार मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४८४** **विषय क्रमांक – ४८४**

**दिनांक- ९/११/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४८४ दिनांक-९/११/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु/मुख्य/तां./कावि/२९३/२०२३, दि.०८/११/२०२३ अन्वये, तरतूदीमध्ये वाढ-घट करणेबाबत. |
| ठराव क्र. ४८४ दिनांक-९/११/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु/मुख्य/तां./कावि/२९३/२०२३, दि.०८/११/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाकडील भांडवली कामासाठी सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये काही कामांसाठी केलेल्या तरतूदी अपु-या असल्यामुळे सोबत जोडणेत आलेल्या प्रपत्र-अ मधील कामांसाठी पाणीपुरवठा विभाग भांडवली कामे 'योजना निधी' व 'विशेष योजना निधी' या लेखाशिर्षांतर्गत तरतूदी वर्ग करणे आवश्यक आहे.<br><br>तरी, सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये पाणीपुरवठा विभाग भांडवली कामे 'योजना निधी' व 'विशेष योजना निधी'या लेखाशिर्षांतर्गत विभागाने प्रस्तावीत केलेल्या प्रपत्र अ नुसार तरतूदीमध्ये वाढ-घट करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**